# नवीन शैक्षणिक धोरण २०२०- दिव्यांगांच्याशैक्षणिक समावेशीकरणाचा अभ्यास

**मयुरेश तानाजी पाटील** संशोधक विद्यार्थीसमाजशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

**प्रस्तावना**

मानव हा समाज प्रिय प्राणी आहे त्याच्यावर होणारे संस्कार हा मानवी जीवनातील महत्वाचा भाग असतो कोणत्याही व्यक्तीवर त्याच्या आजूबाजूच्या समाजातील व्यक्तींचा प्रभाव पडतो आणि त्याच्यातूनच ती व्यक्ती समाजातील नियम, रीती स्वतः मध्ये अंगीकारते. त्याच्या बद्दलच्या इतरांचा दृष्टिकोन एखाद्या व्यक्तीचा "स्व" विकसित होणास करणीभूत असतो. दिव्यांग लोकांच्या समस्यांचे निराकरण आणि त्यांचे सर्वसमावेशक समावेशन करावयाचे असेल तर त्याच्या बद्दल इतर समाजाचा दृष्टिकोन नेमका काय आहे हे समाजावून घेणे काळाची गरज आहे. अपंग मुलाबाबतचा दृष्टिकोन त्याचे जीवन घडविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे त्याचा अभ्यास करणे अगत्याचे आहे परंतु त्याआधी शरीररचना आणि मनोरचना ह्यांचा अपंगतेच्या संदर्भात परस्परांशी काय संबंध आहे हे पाहणे आवश्यक आहे.काही विशिष्ट शरीर रचनेमुळे वागण्यामध्ये काही वेगळेपणा येण्याचा संभव आहे याचा विचार पूर्वीपासून केला जात आहे ह्या शास्त्राला 'सोमॅटोसायकॉलॉजी' असे म्हणतात. अपंगतेच्या विविध प्रकारांमुळे अपंगांना शिकविणाऱ्याशिक्षकांच्या, शैक्षणिक प्रशासकांच्या आणि नियोजकांच्या पुढेनवे प्रश्न उभे राहत आहेत.

अपंगतेमुळे शाळेच्या वातावरणाशी समरस न झाल्यामुळे अथवा इतर विद्यार्थ्यांच्या चेष्टे मुळे एक प्रकारच्या मानसिक व शारीरिक द्वंद्व त्यांच्यात निर्माण होते आणि आपण इतरांप्रमाणे नाही हि न्यूनगंडची भावना निर्माण होऊन दिव्यंग मुले शालेय व्यवस्थेतून बाहेर पडतात त्यासाठी दिव्यांग मुलाच्या शारीरिक आणि मानसिक गरजांनुसार शिक्षणाचे वळण बदलावे लागते. काही वेळा मुलाची अपंगता तीव्र असल्यामुळे त्याला शाळेत येता येत नाही अशा वेळी त्यास घरीच शिकवावे लागते. काही मुलांना त्यांच्या दुर्बलतेनुसार विशेष वैद्यकीय आणि उपचार करावे लागतात. काही अपंग मुले सामान्य शाळेच्या चौकटीत बसत नाहीत. म्हणून त्यांच्याकरिता वेगळ्या शाळा काढव्या लागतात. अंपंगांच्या शिक्षणाचे हे सारे प्रश्न अभ्यासून त्यांच्या शैक्षणिक प्रमेयांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न अलीकडे होत आहे. शिक्षकांची श्रेणी, शालेय व्यवस्था आणि शैक्षणिक नियोजन अशा साकरात्मक दृष्टिकोनातून अपंगांचे शिक्षण वा पुनर्शिक्षण यांचा विचार करावयास हवा अशी जाणीव निर्माण होऊ लागली आहे.

भारताने २१ व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक शैक्षणिक धोरण जाहीर केले. १९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या शिक्षण व्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध आव्हानांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. ए.आय.एस.एच.ई. २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण, विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे. भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार दिव्यांग विध्यार्थांना शिक्षण देणे त्यांच्या समस्यासमजवून घेऊन त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

**संशोधन उद्दिष्ट्ये**

1. दिव्यांगांसाठी नवीन शैक्षणिक धोरणा मध्ये करण्यात आलेल्या तरतुदींचा अभ्यास करणे
2. दिव्यांगांच्या अभ्यासासाठी उपलब्ध असलेल्या सोई सुविधा आणि पायाभूत सुविधा यांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती-**

**संशोधन समस्या-**

दिव्यांगांसाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध आहेत त्या सोयी-सुविधांचा प्रसार आणि प्रचार होणे गरजेचे आहे दिव्यांगांसाठी भारत सरकारने शिक्षणामध्ये विविध पायाभूत सोयी सुविधा आणि तरतुदी या तयार करण्यात आल्या या

सोयी सुविधा आणि तरतुदी अंमलबजावणीसाठी संशोधकाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० शैक्षणिक समावेशाचा अभ्यास या संशोधन समस्येची निवड केलेली आहे.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत विषयात दिव्यांगांच्या शैक्षणिक घटकाच्या अनुषंगाने अध्ययन करावयाचे असल्याने प्रस्तुत संशोधन कार्यासाठी अभ्यासकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. संशोधन क्षेत्र प्रस्तुत संशोधन कार्य राबवण्यासाठी संशोधकाने विद्यापीठाच्या विविध विभागातील संशोधक विद्यार्थी आणि शिक्षक जे पाच दिवसीय कार्यशाळेमध्ये समाविष्ट आहेत. यांची निवड करण्यात आलेली आहे.

**नमुना निवड पद्धती**


प्रस्तुत अभ्यासासाठी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्र घेण्यात आले आहे. प्रत्येक विभागातील माहिती मिळावी यासाठी संशोधकाने या नमुना पद्धतीचा अवलंब केला आहे.

**प्राथमिक तथ्य संकलन**


ऑनलाइन गुगल फॉर्म प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक याच्या कडून गुगल फॉर्मच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. जमा केलेल्या माहितीचे पाय चार्ट माध्यमातून विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**दुय्यम तथ्य संकलन**


प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे दुय्यम माहिती संकलनासाठी पुस्तके वृत्तपत्र इंटरनेट या साधनांचा वापर केला आहे.





आकृती क्रमांक १ मध्ये हे असे दिसून येते की, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी कोणत्या सुविधा असणे आवश्यक आहेत का? या प्रश्नावर संमिश्र प्रतिसाद उत्तर दात्याकडून प्राप्त झाला आहे. उत्तर दात्यांना चार पर्याय पैकी एक निवडण्याची संधी होती. त्यातून ३७.५% उत्तरदात्यांच्या मते जास्तीत जास्त तंत्रज्ञान आवश्यक आहे. ३७.५% उत्तर दात्याकडून त्यांच्या मते सर्वांसोबत शिक्षण देणे योग्य ठरेल तर १८.८ % उत्तर दात्यांच्या मते दिव्यांगांसाठी वेगळी शैक्षणिक व्यवस्था व्हावी असे मत प्रतिपादन केले. तर उर्वरित उत्तरदात्यांच्या मते ऑनलाइन शिक्षणाद्वारे सक्षमीकरण करता येईल. यामधून असे समजते की दिव्यांगांसाठी वेगळी शैक्षणिक व्यवस्था आणि जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करावा.





आकृती क्रमांक २ मध्ये हे असे दिसून येते की, तुम्ही शिकत असलेल्या विभागांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोयी सुविधा आहेत का? हा प्रश्न उत्तर दात्यांना विचारला तेव्हा उत्तर दात्यांची ७५% उत्तर दात्यांनी होय असा प्रतिसाद दिला आहे. व उर्वरित २५% उत्तर दात्यांनी नाही असे उत्तर दिले आहे यावरून असे समजते की दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत.





आकृती क्रमांक ३ मध्ये हे असे दिसून येते की, तुम्ही शिकत असलेल्या विभागांमध्ये पायाभूत सुविधा(Infrastructure) सोयी सुविधा आहेत का? त्यावर ८१.३ % उत्तर दात्यांचे प्रतिसाद हे होकारात्मक असून उर्वरित उत्तर दात्यांनी नाही असा प्रतिसाद दिला आहे यावरून असे समजते की विभागांमध्ये शिकत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा आहेत





आकृती क्रमांक ४ मध्ये हे असे दिसून येते की दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत असे ५६.३ % प्रतिक्रिया देणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटते आणि ४३.८% विद्यार्थ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या संधी उपलब्ध नाहीत असे मत व्यक्त केल्याचे दिसून येते





आकृती क्रमांक ५ मध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी क्रीडाविषयक आणि करमणूक विषयक सुविधा उपलब्ध आहेत का? यामध्ये झालेल्या सर्वेमध्ये असे दिसून आले आहे की ६८.८ % विद्यार्थ्यांना असे वाटते की दिव्यांग विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक आणि करमणूक विषयक कोणत्याही सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत आणि त्यांना सहभागी करून घेतले जात नाही तर ३१.३ % विद्यार्थ्यांना असे वाटते की दिव्यांग विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक आणि करमणूक विषयक सुविधा उपलब्ध आहेत आणि त्यांना त्यांच्या विभागांमध्ये अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जाते





आकृती क्रमांक ६ मध्ये असे दिसून येते की प्रत्येक विभागांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे आरक्षण व शिष्यवृत्ती दिली जाते याला सर्व विद्यार्थ्यांनी होकारात्मक म्हणजेच होय असा १००% प्रतिसाद दिलेला आहे. शासन वेगवेगळ्या योजना, आरक्षण व शिष्यवृत्ती देऊन दिव्यांगविद्यार्थ्यांची प्रगती व्हावी यासाठी प्रयत्नशील असते. तसेच त्यांनी स्वावलंबन व्हावे हा त्या मागचा हेतू असतो.





आकृती क्रमांक ७ मध्ये असे दिसून येते की दिव्यांगांच्या अध्ययनात मदत होण्यासाठी शिक्षकांमध्ये अतिरिक्त कौशल्य आहेत का? यावर जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे उत्तर हे नकारात्मक असल्याचे दिसून आले आहे १६ उत्तरदात्यांपैकी ६२.५% उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले आहे व उर्वरित ३७.५% टक्के उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले आहे.





आकृती क्रमांक ८ मध्ये असे दिसून येते की दिव्यांगांच्या शैक्षणिक अभ्यास साहित्य योग्य रित्या पुरवली जाते का? यावर जास्तीत जास्त उत्तरदात्यांचे उत्तर हे होकारात्मक असल्याचे दिसून आले आहे १६ उत्तरदात्यांपैकी ४३.८% उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले आहे व उर्वरित ५६.३ % टक्के उत्तर दात्यांनी होय असे उत्तर दिले आहे.




आकृती क्रमांक ९ मध्ये असे दिसून येते की दिव्यांगांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी व्यवस्थापन स्तरावरती कोणत्या उपाययोजना आहेत का? यावर जास्तीत जास्त ५६.३% उत्तरदात्यांनी मेडिकलच्या सुविधा उपलब्ध आहेत असे उत्तर दिले आहे. तसेच ३१.३ टक्के ट्रॅव्हल्स सुविधा उपलब्ध आहेत. आणि१२.५ % उत्तरदात्यांनी फायनान्सच्या सुविधा उपलब्ध आहेत असे उत्तर दिले आहे.




आकृती क्रमांक १० मध्ये असे दिसून येते की दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साईन लँग्वेज द्वारे शैक्षणिक प्रणाली उपलब्ध आहे का? यावर जास्तीत जास्त उत्तरदात्यांची उत्तर हे नकारात्मक असल्याचे दिसून आले. १६ उत्तर दात्यांची पैकी १२.५ % उत्तर दात्यांनी होयअसे उत्तर दिले. व उर्वरित ८७.५% टक्के उत्तर दात्यांनी नाही असे उत्तर दिले. यावरून असे दिसून येते की लोकांना सुविधा पुरवल्या पाहिजे त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले पाहिजे





आकृती क्रमांक ११ मध्ये असे दिसून येते की महत्वाच्या सूचना दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात का? यावर सर्वे केला असता १५ उत्तरदात्यांपैकी ४३.८% % उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले. व उर्वरित ५६.३ % टक्के उत्तर दात्यांनी नाही असे उत्तर दिले आहे




*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT /Vol. XI / Issue – III* *ISSN 2277-8063*


आकृती क्रमांक १२ मध्ये असे दिसून येते की दिव्यांग विद्यार्थ्यांना यामध्ये योग्य पद्धतीने आसन किंवा बसण्याची व्यवस्था आहे का? १५ उत्तर दात्यांची पैकी ५६.३% उत्तर दात्यांनी होय असे उत्तर दिले व उर्वरित ४३.८% उत्तर दात्यांनी नाही असे उत्तर दिले आहे.




आकृती क्रमांक १३ मध्ये असे दिसून येते की दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक समस्यांचे निराकरण व्यवस्थापनाकडून केले जाते का? यावर जास्तीत जास्त उत्तर दात्यांची उत्तर हे होकारात्मक असल्याचे दिसून आले१५ उत्तर दात्यांची पैकी ७३.३ % उत्तर दात्यांनीहोय असे उत्तर दिले व उर्वरित २६.७% टक्के उत्तर दात्यांनी उत्तर नाही. यावरून असे दिसते की दिव्यांग विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाकडून मदत केली जाते.




आकृती क्रमांक १४ मध्ये असे दिसून येते कीदिव्यांगांचे विविध प्रकारानुसार त्यांना विशिष्ट प्रकारच्या सुविधा दिल्या जातात का? असा प्रश्न उपस्थित केल्यास एकूण उत्तर दात्यांची पैकी ५६.३% उत्तर दात्यांनी नकारात्मक असल्याचे दिसून आले आहे. सुविधा दिल्या जात नाहीत हे उत्तर निवडले आहे. आणि ४३.८% उत्तर दात्याने होय. या पर्यायाची निवड केली असून त्यांच्या मते त्यांना विविध प्रकारानुसार विशिष्ट प्रकारच्यासुविधा दिल्या जातात. यावरून असे समजते की दिव्यांगांच्या विविध प्रकारानुसार त्यांना विशिष्ट प्रकारच्या सुविधा दिल्या जात नाही.




आकृती क्रमांक १५ मध्ये असे दिसून येते की नॅशनल सेंटर फॉर एक्सेसएबल एन्व्हायरमेंट च्या नियमावलीनुसार पायाभूत सुविधांची कल्पना आहे का? या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दात्यांना कडून प्रतिसाद मिळाला. त्यावरून ६२.५ % उत्तरदात्याच्या मते पायाभूत सुविधांची कल्पना आहे अशी माहिती प्राप्त झाली. त्याचप्रमाणे ३७.५% उत्तर दात्याच्या मते पायाभूत सुविधांची कल्पना नाही आहे उत्तर दाते यांच्या प्रतिसादावरून असे समजते की नॅशनल सेंटर फॉर एक्सेसएबल एन्व्हायरमेंट च्या नियमावलीनुसार पायाभूत सुविधांची कल्पना आहे

**निष्कर्ष**

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करावा असे उत्तर दात्यांचे मत आहे ७५% शिवाजी विद्यापीठातील विभागांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सोईसुविधा उपलब्ध आहेत ८१.३% विभागांमध्ये दिव्यांगांसाठी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत.दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरीची संधी उपलब्ध आहेत. विभागांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शासन नियमाप्रमाणे आरक्षण व शिष्यवृत्ती शंभर टक्के मिळत असल्याचे दिसून येते. दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी अतिरिक्त कौशल्य आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साईन लँग्वेज द्वारे शैक्षणिक प्रणाली या दोन्ही घटकाची कमतरता शिवाजी विद्यापीठातील विभागामध्ये दिसून येते.

**संदर्भ साहित्य**

1. Jameel, S. S. (2011). Disability in the Context of Higher Education: Issues and Concerns in India, *Electronic Journal for Inclusive Education*, 2 (7).

2. Kendall, L. (2016). Higher education and disability: Exploring student experiences. *Cogent Education*, *3*(1), 1256142.

3. Rao, P. S. (2019). Rights of Person with Disability in India – A Study: *International Journal of Marketing and Human Resource Management*, 10(2), 2019, pp. 9–13.

4. McKinney, E. L., & Swartz, L. (2020). Integration into higher education: experiences of disabled students in South Africa. *Studies in Higher Education*, 1-11.

5. Sivanandan, V., & Sivanandan, V. (2017). Educational status of populations with Disability in Pune District of Maharashtra, India: International Journal of Advanced Research, 5(8), pp. 2054-2064.